


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक २६९, शुक्रवार १२ जुलै २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# पारनेरच्या उमेदवारीबाबत पक्षाचे नेतृत्व निर्णय घेईल

## ■ महाराष्ट्र टाईम्स, म.टा. कट्टयावर खा. नीलेश लंके ■ इंग्रजीत शपथ घेणाऱ्या खा. नीलेश लंके यांची मराठीत मुलाखत

**मुंबई : विशेष प्रतिनिधी**

**पारनेरचा आमदार कोण होणार हे माझा पक्ष ठरवेल. मी माझ्या पक्षातला शेवटचा घटक आहे. मी खासदार म्हणून महत्वाचा नाही तर संघटनेचा कार्यकर्ता म्हणून महत्वाचा आहे. पक्षाच्या नेतृत्वाला जे अपेक्षित आहे ते पारनेर मतदारसंघात होणार आहे. महाविकास आघाडीचे जागावाटप होईल, त्यानंतर पारनेरमध्ये कोणाला उमेदवारी द्यायची हे नेतृत्व ठरवेल असे महाराष्ट्र टाईम्स, म.टा. कट्टयावर इंग्रजीत शपथ घेणाऱ्या खासदार नीलेश  लंके यांनी त्यांच्या मराठी मुलाखतीमध्ये स्पष्ट केले.**




यावेळी बोलताना लंके म्हणाले, राजकारणात व्यक्तीला विविध पदे मिळतात, त्याचे सर्व श्रेय मतदारांना जाते. मतदारांसह मीच उमेदवार आहे या भावनेतून जी इर्शा तयार होते त्या कार्यकर्त्यांनाही जाते. उमेदवार हा मोहरा असतो. रिमोट जनतेच्या, कार्यकर्त्यांच्या हाती  असतो. मी माध्यम आहे. इंग्रजीमध्ये शपथ घेण्याची कल्पना कोणी द्यावी लागत नाही. ग्रामपंचायतीचा सरपंच ते खासदार उगाच झालो नाही.महाराष्ट्रात मी आमदार झाल्यानंतर कोणी इंग्रजीत शपथ घेण्यास सांगितले असते तर मी तशी शपथ घेतली नसती कारण महाराष्ट्रात मराठीलाच महत्व दिले जाते. संसदेत गेल्यानंतर आपण वेगळा पायंडा पाडला पाहिजे. तिथे सगळेच मराठी भाषिक खासदार नाहीत. कोणी तेलगू तर कोणी तमीळ, उर्दू भाषिक आहेत. बहुतांश सगळया खासदारांना इंग्रजी समजते त्यामुळे सर्वांना समजणारी भाषा म्हणून मी इंग्रजीत शपथ घेतली. भाषणाची मी कधीही तयारी करत नाही. मी पाहिलाच तयार असल्याचे खा. लंके म्हणाले.

### दादा महायुतीचे नेते, त्यांना टीका करावीच लागेल

महायुतीमध्ये अजितदादा आहेत. तीनही पक्षाच्या या युतीच्या उमेदवाराच्या प्रचारासाठी कोणताही नेता गेला तर त्या उमेदवारासाठीच बोलावे लागते. विरोधी उमेदवार तुमच्या कितीही जवळचा असो, त्याच्या विरोधात टीका टिपन्नी करावीच लागते. त्यामुळे त्या गोष्टींकडे दुर्लक्ष करायचे असते. ते त्यांच्या उमेदवाराच्या प्रचाराला आले, त्यांनी माझ्यावर टीका केली, त्याला आपण प्रत्युत्तर द्यायचे का ? दादा राज्याचे नेते आहेत. त्यांच्याविषयी न बोललेले बरे. निवडणूकीदरम्यान अजित पवार यांनी केलेल्या टीकेविषयी विचारण्यात आलेल्या प्रश्नावर खा. लंके यांनी हे उत्तर दिले.

### माझ्याकडे जीवाला  जीव देणारे सहकारी

कोणतीही निवडणूक फार अवघड आणि फार सोपी नसते. यंत्रणेवर निवडणूक होत नसते. संस्थेतील कर्मचारी यांच्यावर निवडणूक होत नाही. ज्याच्याकडे इर्षेने लढणारे कार्यकर्ते आहेत, जीवा भावाचे, जीवाला जीव देणारे कार्यकर्ते असतात त्या उमेदवाराला विजय संपादन करता येतो. विरोधी उमेदवाराकडे संस्था आणि इतर बाबी होत्या. त्यांचे साचेबंद काम होते. सकाळी १० वाजता डबा घेऊन येणारे कर्मचारी सायंकाळी पाच वाजता घरी जात होते. माझ्याकडे उपाशी फिरणारे सहकारी होते. विरोधी उमेदवाराचे कर्मचारी उपाशी फिरू शकत नाहीत. माझ्या इतका आत्मविश्वास राज्यातील ४८ खासदारांमध्ये नसेल. अर्ज दाखल केला त्याच वेळी मीच विजयी होणार याची खात्री दिली होती. निवडणूकीत लोकांच्या -हदयावर राज्य करावे लागते. सर्व मतदार मी प्रेमाने जोडले. समाजकारण, अर्थकारण आणि विविध संस्था अशा गोष्टी विरोधी उमेदवाराकडे असताना कोरोना काळातील कामाच्या जोरावर निवडणूक कशी जिंकली या प्रश्नावर बोलताना खा. लंके यांनी हे उत्तर दिले.

### पवार साहेबांचे अनुकरण करतो, अनेक गोष्टी अवगत करतो

आपण ज्यावेळी ज्या नेतृत्वाबरोबर राहतो. त्यांचे काय अनुकरण केले पाहिजे हे आपण ठरविले पाहिजे. पवार साहेबांच्या सहवासात असताना मी त्यांच्या अनेक गोष्टींचे अनुकरण करतो. अनेक गोष्टी अवगत करून घेतो. त्यांच्यासोबत मला संसदेत जाण्याचा योग आला. मी अनेक भाषणात सांगतो की नीलेश लंके हा विद्यार्थी आहे त्यामुळे मी नेहमी  शिकत असतो. विद्यार्थी आणि प्राचार्य यात फरक असतो. प्राचार्य शिकत नाही. मी मात्र विद्यार्थी म्हणून शिकतो. पवार साहेबांकडून शिकतो असे खा. लंके म्हणाले.

### संसदेत सुप्रियाताईचे अनुकरण

संसदेमध्ये सुप्रियाताई आमच्या सोबत असतात. पावला पावलावर आम्ही त्यांचे अनुकरण करतो. प्रत्येक खासदाराशी कसा संवाद साधला पाहिजे ? विविध कामांचा कसा पाठपुरावा करावा याचे आम्ही अनुकरण करत असल्याचे लंके म्हणाले.

### राणीताई लंके यांचे नाव पुढे करून गुगली टाकली

कोणत्याही राजकारणात एक सस्पेन्स लागतो. लोकसभेची निवडणूक मीच लढविणार होतो. राणी लंके यांचे नाव पुढे करून मी गुगली टाकली होती. लोकांना संभ्रमावस्थेत ठेवण्याचा तो प्रयत्न होता. लोकांची मानसिकता काय आहे हे मी तपासत होतो. त्यात मी यशस्वी झालो. मीच उमेदवार असतो तर ही निवडणूक मी जिंकू शकतो याची मला खात्री होती.

### राजकारणात वेळेनुसार निर्णय घ्यावे लागतात

राजकारण ठरवून करता येत नाही. वेळेनुसार राजकारणात निर्णय घ्यावे लागतात. कधी काय परिस्थिती उदभवेल हे राजकारणात सांगता येत नाही. राष्ट्रवादी, शिवसेनेचे दोन भाग होतील असे तीन वर्षापूर्वी कोणाला वाटले होते का ? राजकारणात त्या त्या वेळेनुसार निर्णय घ्यावे लागतात. त्या परिस्थतीमध्ये मी लोकसभेबाबत निर्णय घेतल्याचे लंके म्हणाले. अजित पवारांना सोडून शरद पवार गटामध्ये जाण्याच्या निर्णयाबाबतच्या प्रश्नावर खा. लंके यांनी आपली भूमिका मांडली.

### ज्यांना बोलायचे ते थेट साहेबांशी बोलतील

महाविकास आघाडीतील इन्कमींगसाठी बोलण्याची जबाबदारी पवारांनी नीलेश लंके यांच्यावर दिली असल्याचे बोलले जात असल्याबद्दल विचारण्यात आले असता खा. लंके म्हणाले, माझ्यावर जबाबदारी देण्याची आवश्यकता नाही. सर्व आमदारांना पवार साहेबांविषयी आत्मयीता आहे. वर्धापनदिनाला अजितदादाही पवार साहेबांचे नाव घेताना भावनीक झाले होते. ज्यांना बोलायचे ते थेट पवार साहेबांशी बोलतील असे लंके यांनी स्पष्ट केले.

### राणी लंके यांच्या उमेदवारीबाबत पक्ष निर्णय घेईल

राणी लंके यांना विधानसभेची उमेदवारी देण्याबाबत पक्षाचे नेतेमंडळी निर्णय घेतील. त्याबाबत निर्णय घेणारा मी कोण ? पक्ष जी जबाबदारी देईल ती पुर्ण करायची ही माझी भूमिका असते. त्यामुळे राणी लंके यांना शब्द देणारा मी कोण असा सवाल लंके यांनी राणी लंके यांची लोकसभेची उमेदवारी कापल्यानंतर विधानसभेच्या उमेदवारीचा शब्द देणार का या प्रश्नावर बोलताना खा. लंके यांनी केला.

### सत्ता नाही म्हणून रडत बसायचे का ?

तुमच्याकडे काम करण्याची इच्छाशक्ती असेल तर अशक्य कोणतीही गोष्ट नाही. लोकांसाठी झटण्याची तुमची इच्छा असली पाहिजे. रडणारी माणसे काम करू शकत नाहीत. मी काम करणारच या भावनेतून काम केले तर पक्ष पार्टी काही नाही, आम्ही ध्येय वेडे माणसे आहोत. लोकांसाठी लढण्याची ताकद आमच्याकडे आहे. एखाद्या मंत्र्याच्या दारात मी चार  चार तास कामांसाठी बसलो आहे. कारण लोकांनी मला त्यासाठीच निवडूण दिले आहे. प्रतिष्ठेसाठी मान-पाणासाठी नाही. प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी मला संसदेत मतदारांनी पाठविले आहे. ही भावना डोक्यात ठेऊन काम केले तर अवघड काही नाही. सत्ता असताना काम करता येते आणि सत्तेबाहेरील खासदाराला काम करता येत नाही असे काही नाही. अनेक खासदार २५-३०  वर्षे सत्तेबाहेर राहून निवडूण येतात ते कसे निवडूण येतात ? सगळीकडे राजकारण नसते. मंत्री महोदय प्रत्येक वेळी राजकारण करत नाहीत. काम करणारांना मदत केली जाते. मी पाच वर्षे आमदार होतो, माझ्या कार्यालयात आलेल्या कोणत्याही व्यक्तीला त्याचा पक्ष, पार्टी विचारली नाही. पदावर गेल्यानंतर आपण समाजाला न्याय दिला पाहिजे अशा विचारसणीने काम केले पाहिजे. तशाच विचारसणीचे लोक मंत्री म्हणून काम करतात. त्यामुळे कामे करताना अडचण येत नाही. सत्ता नाही म्हणून रडत बसायचे का ?  असा सवाल लंके यांनी केला.

### माझी सेक्युलर विचारसरणी

लोकसभा निवडणूकीत मला सर्व जाती धर्माच्या लोकांनी मदत केली. मी एक असा माणूस आहे की माझ्यावर कुठल्या जाती धर्माचा शिक्का पडलेला नाही. मी सेक्युलर विचारसणीचा कार्यकर्ता आहे. त्यामुळे सर्वच जातीधर्माच्या मतदारांचा मला फायदा झाला. माझ्या विजयात लहान मुलांपासून ९०-९५ वर्षाच्या ज्येष्ठांचा सहभाग आहे. त्यामुळे विजयाचे श्रेय सर्वांचे आहे. मराठा, ओबीसी आरक्षणाच्या प्रश्नावर बोलताना लंके यांनी ही भूमिका मांडली.

### सर्व पक्षातून मला मदत

लंके यांच्या संग्रामात ज्यांचा विवेक जागृत आहे अशा अदृश्य शक्तींनी प्रत्यक्ष मदत केल्याबाबतच्या प्रश्नावर बोलताना खा.लंके म्हणाले, तुम्हाला निवडणूकीची सिस्टम राबविता आली पाहीजे. अदृश्य ताकद उभी करता आली पाहिजे. अदृश्य ताकदीचे मी आभार मानले. जाहिर बोलू शकत नाही कारण त्यांना त्यांच्या पक्षातून काढून टाकतील. असा कोणताही पक्ष नाही की त्या पक्षातील नेत्यांनी मला मदत केली नाही असे लंके यांनी स्पष्ट केले.

### राजकारणात साधू संतांवरही आरोप होतात

नीलेश लंके गुंडगीरी करतात  या आरोपाविषयी बोलताना लंके म्हणाले, निवडणूकीत साधू संतांवर आरोप होतात. मी गुंडगिरी केली असती तर इथपर्यंत पोहचलो असतो का ? माझा राजकीय प्रवास पाहिला तर माझ्या कुटूंबातील कोणी राजकारणात होते का ? प्रेमाने वागलो म्हणून निवडणूकीत यशस्वी झालो. गुंडगिरी करणारा एखाद्या निवडणूकीत एखाद्या निवडणूकीत यशस्वी झाला असता, सगळ्या निवडणूकीत यशस्वी झाला असता का ? असा सवाल त्यांनी केला.

### राजकारणात मागचे सोडून द्यायचे असते

लंके जरी राष्ट्रवादीत असले तरी मनाने शिवसेनेत असल्याबाबतच्या प्रश्नावर बोलताना मनाने व देहाने असे कुठे असते का ? सेनेत होतो. पुढे माझी हकालपट्टी झाली. पुढे पवार साहेबांसोबत गेलो. त्यानंतर महाविकास आघाडीचे सरकार सत्तेत आले. माझी हकालपट्टी केली म्हणून वैर करायचे का ? रात गई बात गई. अनेक कामे मी उध्दव ठाकरे यांच्याकडून करून घेतली आहेत. राजकारणात मागचे सोडून द्यायचे असते असे लंके म्हणाले.

# पुरवठा विभागातील अनागोंदी विरोधात लंके प्रतिष्ठानचा उद्या ठिय्या

## प्रलंबित प्रकरणांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढच



**पारनेर : प्रतिनिधी**

**पारनेर तहसील कार्यालयात प्रलंबित असलेली प्रलंबित प्रकरणे येत्या दोन दिवसांत मार्गी लावावीत अन्यथा १२ जुलै रोजी तहसील कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करण्याचा इशारा नीलेश लंके प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात आला आहे.**

यासंदर्भात तहसीलदार गायत्री सैंदाणे यांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की,पारनेर तहसील कार्यालयातील विविध प्रलंबित प्रकरणांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे.पुरवठा विभागात अनागोंदी कारभार सुरू आहे.नवीन,दुबार शिधा पत्रिकांचे वाटप अत्यंत संथगतीने सुरू आहे. उर्वरीत पान ३ वर









# युवा

## लग्नानंतर किती दिवसांनी पती-पत्नी घटस्फोट घेऊ शकतात?

**विवाह ही एक सुंदर गोष्ट आहे. या सोहळ्याच्या माध्यमातून दोन व्यक्ती एका सुंदर बंधनात बांधल्या जातात. लग्नानंतर दोघे एकत्र आयुष्य जगू लागतात. पण अनेकदा लग्नानंतर पती-पत्नीमध्ये वैचारिक मतभेद निर्माण होतात. दिवसेंदिवस भांडणे वाढू लागतात. पती-पत्नीचे चांगले जमत नाही. हे भांडण इतके वाढतात की प्रकरण घटस्फोटापर्यंत पोहोचते. जर पती-पत्नी या नात्यामध्ये खुश नसतील तर ते घटस्फोट घेऊ शकतात. लग्नानंतर अनेक गोष्टी घडतात, ज्यामुळे पती-पत्नीला एकमेकांपासून वेगळे व्हायचे असते. अशा स्थितीत फक्त भांडणामुळेच दोघे वेगळे व्हायला हवेत असे नाही. अशा वेळी दोघेही परस्पर संमतीने एकमेकांपासून वेगळे होऊ शकतात. काहींचे लग्न त्यांच्या मना विरुद्ध होते अशा परिस्थितीत तुम्ही किती दिवसात घटस्फोट घेऊ शकता याची माहिती घेऊयात...**

कायद्यानुसार पती-पत्नी एकमेकांना घटस्फोट देऊ शकतात. पण प्रश्न असा आहे की लग्नाच्या अवघ्या एक महिन्यानंतर कोणाला घटस्फोट घ्यायचा असेल तर? अशा परिस्थितीत पती-पत्नीला घटस्फोट घेण्यासाठी किमान 1 वर्ष वाट पाहावी लागेल. खरे तर आता जर पती-पत्नीचे लग्नानंतर चांगले जमत नसेल, तर लग्नाच्या एका आठवड्यानंतरच ते घटस्फोटासाठी अर्ज करू शकतात आणि वेगळे राहू शकतात. पण घटस्फोट मंजूर करण्यापूर्वी न्यायालयाने दोन्ही पक्षांना 6 महिन्यांची मुदत दिली आहे, जेणेकरून त्यांना समेट करायचा असेल तर ते तसे करू शकतात.



### अर्ज कसा करावा

हिंदू विवाह कायदा 1955 अंतर्गत घटस्फोट घेता येतो. परंतु दोन्हीबाबत वेगवेगळ्या कलमांत तरतूद करण्यात आली आहे. घटस्फोटाचा मुद्दा कलम 13 मध्ये नमूद केला आहे, तर न्यायालयीन विभक्ततेबाबतचे नियम कलम 10 मध्ये नमूद केले आहेत. विवाहित जोडपे ज्यांना लग्नानंतर एक वर्षाच्या आत वेगळे व्हायचे आहे. ते विभक्त होण्यासाठी न्यायालयात जाऊ शकते.

### मालमत्तेचे विभाजन

घटस्फोटानंतर संपत्तीचीही विभागणी होते. जर पत्नी कोणतीही नोकरी करत नसेल तर तिला पतीच्या मालमत्तेत हक्क मिळतो. पण जर पत्नी नोकरी करत असेल तर त्याच्याशी संबंधित इतर नियम आहेत ज्यासाठी कायद्याची मदत घ्यावी लागेल.

### घटस्फोट घेणे सोपे नाही

घटस्फोटाचे खरे स्वरूप टीव्हीवर दाखवल्या जाणाऱ्या प्रक्रियेपेक्षा खूप वेगळे आहे. खऱ्या जीवनात घटस्फोट घेणे अजिबात सोपे नाही. तुम्ही कोणत्याही क्षणी भावनिकदृष्ट्या कमकुवत होऊ शकता. म्हणून, आपल्या कुटुंबाशी आणि मित्रांशी जोडलेले राहा. जेणेकरून या कठीण काळात तुम्हाला एकाकीपणा आणि चिंतेतून जावे लागणार नाही.

### तुमचा सहभाग आवश्यक

कोर्टात तुमची बाजू मांडण्यासाठी तुम्ही तुमच्या स्वतःच्या वकिलाची नेमणूक केली असली तरी प्रत्येक छोट्या-छोट्या गोष्टीत सक्रिय राहणे तुमच्यासाठी खूप महत्त्वाचे आहे. यासाठी तुमच्या मनात निर्माण होणारा प्रत्येक प्रश्न तुमच्या वकिलाला विचारा आणि तुम्हाला काही समजत नसेल तर तुम्ही त्यांच्याकडून खुलासाही मागू शकता.



## मिठीचं गणित...



**एक घट्ट मिठी तुमच्या आणि तुमच्या जोडीदारामधील सर्व गैरसमज आणि तक्रारी मिटवण्याची ताकद ठेवून असते. जेव्हा जेव्हा तुम्हाला संधी मिळेल तेव्हा तुमच्या जोडीदाराला एक प्रेमाची घट्ट मिठी आवर्जून मारा. यातून तुमचे त्यांच्यावर किती प्रेम आहे हे देखील दिसून येते. मिठी मारणे ही एक भावनिक आणि सुरक्षित प्रतिक्रिया आहे. तुमचा प्रिय व्यक्ती तुम्हाला घट्ट मिठी मारतो तेव्हा तुम्हाला सुरक्षितता, प्रेम आणि त्याची काळजी त्यातून फील होते. मिठी मारल्याने तुमची नाती मजबूत होतातच, पण त्यामुळे तुमची स्ट्रेस अर्थात ताणतणावाची पातळीही कमी होते. पण या मिठींचे सुद्धा काही छान तर काही गूढ असे अर्थ असतात जे तुम्हाला माहीत असल्यास पार्टनरच्या मनातील भावना ओळखण्यास मदत होऊ शकते...**

- रेस्ट-ऑन-शोल्डर हग : जर तुम्हाला तुमच्या जोडीदाराला अशा प्रकारे मिठी मारायला आवडत असेल तर तुमच्या नात्यात खूप प्रेम, माया आणि समज आहे. तुम्हाला जोडीदाराची उपस्थिती हवीहवीशी वाटते आणि त्याचा स्पर्श तुम्हाला आनंद देतो आणि तुम्हाला कम्फर्टेबल सुद्धा वाटतो.
- द बॅक हग : मागून मिठी मारून तुमचा पार्टनर तुम्हाला सांगण्याचा प्रयत्न करत असेल की तो किंवा ती तुम्हाला खूप दिवसांपासून मिस करत आहे. जर तुमचा जोडीदार तुम्हाला नियमितपणे अशी मिठी मारत असेल तर समजून जा की त्याचे तुमच्यावर भयंकर प्रेम आहे. ही मिठी हे देखील दर्शविते की जेव्हा तो मागून कमरेभोवती आपले हात गुंडाळतो तेव्हा त्यातून तो संरक्षण प्रतीत करत असतो.
- ग्रेस ऑन वेस्ट हग : या प्रकारची मिठी हे दर्शविते की तुम्ही तुमच्या जोडीदारासोबत खूप घट्ट नाते शेअर करता जिथे प्रेम, विश्वास आणि भरपूर प्रणय आहे. तुम्ही आणि तुमच्या जोडीदाराला अधिक जवळ आणणारी ही मिठी आहे. तुमचा जोडीदार तुमच्याशी किती खोलवर जोडला गेला आहे हे या मिठीतून दिसून येते.
- 'नेव्हर लेट यु गो' हग : ही ती मिठी आहे जेव्हा दोन लोक एकमेकांना घट्ट धरून आलिंगन देतात. यावरून दोघांनाही एकमेकांपासून वेगळे होण्याची भीती वाटत असल्याचे दिसून येते. याला डेड लॉक हग असेही म्हणतात. अशा प्रकारे मिठी मारणे हे दृढ वचनबद्धता, विश्वास आणि एकतेचे प्रतीक आहे. जर तुम्ही आणि तुमचा जोडीदार अशा प्रकारे मिठी मारत असाल तर तुम्ही एकमेकांबद्दल सिरीयस आहात हे कळते.
- वन आर्म हग : या मिठीशी दोन अर्थ जोडलेले आहेत. प्रथमतः ही मिठी फ्रेंड-झोन दर्शवते आणि दुसरा अर्थ असा की तुमच्या जोडीदाराला सार्वजनिक ठिकाणी कपल म्हणून तुमच्याकडे पाहिले जाऊ नये अशी इच्छा असते. या प्रकारची मिठी अर्धी मिठी मानली जाते, ज्यामध्ये फक्त एकच व्यक्ती आपल्या जोडीदाराभोवती हात ठेवते. लग्नाआधी जर एखादा मुलगा किंवा मुलगी अशी मिठी मारत असेल तर सावध व्हावे. कदाचित पुढे जाऊन तुमची फसवणूक होऊ शकते. कदाचित पुढे जाऊन ती अथवा तो प्रेम आहे हे मान्य करण्यास नकार देऊ शकतात.

## लग्न होत नसेल तर...



**जर तुम्हीदेखील मुलीचे लग्न कधी होणार या समस्याने हैराण असाल तर काळजी करण्याची गरज नाही. कारण या परिस्थितीतून जाणारे तुम्ही एकटे नाहीत. पण भारतात, या परिस्थितीमुळे पालकांना तणावग्रस्त होणे सामान्य आहे. कारण आजच्या आधुनिक काळातही, मुलीचे वयाच्या एक वर्षाच्या आत लग्न करणे समाजात मान्य केले जाते. तसे झाले नाही तर विविध प्रकारचे प्रश्न, टोमण्यांना समोरे जावे लागते. मात्र, या सगळ्याची काळजी करून काहीच मिळणार नाही. तुमच्याही मुलीचे किंवा जवळच्या व्यक्तीचे लग्न ठरत नसेल तर तिला हे प्रश्न नक्की विचारा...**

- नक्की लग्न करायचे आहे का? : तुम्हाला नक्की लग्न करायचे आहे का? हा एक प्रश्न आहे जो बहुतेक पालक विचारणे आवश्यक मानत नाहीत. परंतु सत्य हे आहे की ते विचारणे सर्वात महत्वाचे आहे. असे




होऊ शकते की तुमच्या मुलीला करिअरमध्ये काहीतरी साध्य करायचे आहे, तिला तिचे नाव मोठे करायचे असेल किंवा तिचा लग्नावर विश्वास नाही. पण हे सर्व तेव्हाच समजेल जेव्हा तुम्ही त्याच्याशी याबद्दल बोलाल. त्यामुळे मुलीचे लग्न करण्याआधी त्यांना हा प्रश्न नक्की विचारा.
- तुम्हाला दुसरे कोणी आवडते का? : भारतात मुली सहसा त्यांच्या पालकांना अशा कोणत्याही अनुभवाविषयी सांगत नाहीत. ज्यामुळे एकतर त्यांना तणावात टाकले जाते. यामुळे मुली सगळ्यांपासून गुपचूप रिलेशनशिपमध्ये राहतात. हे शक्य आहे की तुमची मुलगी देखील एखाद्याशी गंभीर नात्यात आहे आणि तिला त्याच्यासोबत सेटल व्हायचे आहे. त्यामुळे त्याच्याकडून जाणून घेण्याचा प्रयत्न करा की तो दुसऱ्याला आवडतो का? पण लक्षात घ्या ही गोष्ट लक्षात घ्या की या संदर्भात तुम्हाला खूपच शांतपणे बोलायचे आहे.
- तुमच्या काही अटी आहेत का? : अनेकदा असे दिसून येते की, अरेंज्ड मॅरेजमध्ये पालक मुलाच्या दिसण्यापासून ते नोकरी आणि कुटुंबापर्यंत सर्व माहिती तपासतात, पण मुलीला काय हवे आहे ही गोष्ट विचारत नाहीत. साधारणपणे असा समज असतो की मुलींना दुसऱ्याच्या घरी जुळवून घेण्यासाठी काही त्याग करावा लागतो, पण सत्य हे आहे की अशी परिस्थिती पूर्णपणे टाळता येते. तुमच्या मुलीला विचारा की तिला कोणत्या प्रकारचा मुलगा आणि कुटुंब हवे आहे, जो तिच्या व्यक्तिमत्त्वाशी आणि स्वप्नांशी मिळून जळून घेणारा जोडीदार मिळणे गरजेचे असते.

### भूतकाळाच्या खूणा

अनेकवेळा नात्यात असे काही घडते, ज्याची हृदयावर खोलवर छाप पडते. यामुळे बरेच लोक प्रेम आणि त्याच्याशी संबंधित कोणत्याही प्रकारच्या नात्यापासून दूर जातात. तुमच्या मुलीशी मोकळेपणाने बोला आणि तिच्यासोबतही असेच काही घडले आहे का, हे जाणून घेण्याचा प्रयत्न करा. ती जे काही उत्तर देईल, ते मोठ्या मनाने स्वीकारा आणि जर तुम्हाला वाटत असेल की तिला अशा भावनिक नुकसानातून बाहेर पडण्यासाठी तज्ञांची मदत हवी असेल तर ते देखील घेण्यास अजिबात संकोच करू नका.

## मित्र सतत उधार मागतात?



**असे म्हणतात की लक्ष्मी आणि कुबेर वगळता जगातील प्रत्येकाला पैशाची गरज असते. प्रत्येकाला जीवनात कधी ना कधी अशा परिस्थितीचा सामना करावा लागतो, जेव्हा त्याला अतिरिक्त पैशांची गरज भासते. कठीण काळात आपल्याला फक्त आपले मित्र आणि नातेवाईक आठवतात. अशा वेळी प्रियजनांना मदत करण्यात काही गैर नाही. तथापि, हे देखील खरे आहे की नात्यानात्या मधील पैशाची देवाणघेवाण कटुतेचे कारण बनू शकते. विशेषतः अशी प्रकरणे तेव्हा घडतात जेव्हा एखादी व्यक्ती गरजेपोटी नव्हे तर त्याचा छंद पूर्ण करण्याच्या नादात किंवा त्याच्या निष्काळजी वृत्तीमुळे आर्थिक संकटात सापडते. अशा लोकांसाठी पैसे परत करणे कठीण असते. कारण त्यांना मनी मॅनेजमेंट कसे करावे हेच माहित नसते. तुमच्या आजूबाजूला असे काही नातेवाईक किंवा जवळच्या व्यक्ती असतील ज्या वारंवार उधार मागत असतील तर आज या लेखातून आम्ही तुम्हाला काही पद्धती सांगतोय ज्या सततच्या त्रासातून बाहेर पडण्यास तुम्हाला मदत करू शकतात...**

- सरळ नाही म्हणा : विनाकारण सर्वांकडून कर्ज मागत फिरणाऱ्या लोकांची कमी नाही. ते त्यांच्या मित्र आणि नातेवाईकांकडून पैसे घेतात आणि ते वेळेवर परत करत नाहीत. जर त्यांनी तुमच्या सोबत अनेकदा असे केले असेल, तर स्पष्टपणे नकार देण्यास अजिबात संकोच करू नका, अन्यथा त्यांना उधारी देऊन देऊन, तुमच्यावर उधारी मागण्याची वेळ येईल.
- तुमच्या गरजांबद्दल सांगा : जर तुम्हाला माहित असेल की एखाद्या नातेवाईक किंवा मित्राला उधारी मागण्याची सवय लागली आहे आणि तो ही उधारी त्याचे छंद पूर्ण करण्यासाठी मागत असेल तर तुम्ही तुमच्या गरजा त्याला समजावून सांगायला हवा आणि सतत उधारी देणे तुम्हाला शक्य नाही हे त्याला सांगायला हवे. तुमच्या खर्चाबद्दल त्याला मनमोकळेपाने सांगा. तुम्ही तुमच्या बचतीतून वारंवार पैसे दिल्यास तुम्हाला कोणत्या प्रकारच्या समस्यांना सामोरे जावे लागेल ते देखील सांगा. यामुळे कदाचित तो पुन्हा तुमच्याकडे उधारी मागणार नाही.
- समोरचा गरीब बनत असेल तर तुम्ही डबल गरीब व्हा : जर तुमच्या समोरची व्यक्ती तुम्हाला इमोशनल भावनेने फसवत असेल आणि तुम्हाला प्रत्येक वेळी पैसे द्यायला लावत असेल तर तुम्ही त्याच्या पेक्षाही तुमची अवस्था दयनीय आहे हे दाखवायला सुरुवात केली पाहिजे. उदाहरणार्थ, जर तो म्हणाला, माझ्याकडे घालायला कपडेही नाहीत, तर तुम्ही असेही म्हणावे की माझं पण असंच आहे. मी स्वतः 4 वर्षे जुने कपडे परिधान करत आहे.



- मी स्वतःच उधारीवर जगतोय : समोरचा जर तुमच्याकडे उधारी मागण्यास अजिबात कचरत नसेल तर तुम्ही देखील जरा हुशार होऊन तुम्ही स्वतःच त्याच्याकडे उधारी मागावी वा त्याला दाखवावे की तुम्हीच उधारीवर जगत आहात. उदाहरणार्थ, तुम्ही असे म्हणू शकता की माझ्याकडचेच पैसे संपले आहेत आणि मीच माझ्या मित्राकडून किंवा ऑफिस मधल्या सहकाऱ्याकडून उधारी घेतली आहे.
- हे कारण सुद्धा चांगले आहे : तुम्ही पैसे मागणाऱ्या व्यक्तीला तुमचा पैसा तुमच्याकडेच नसतो हे सांगू शकता. तुम्ही त्याला कारण देऊ शकता की तुमचा सगळं पैसा हा तुमच्या आई वडिलांकडे किंवा बायकोकडे असतो आणि तुम्हालाच तुमचे पैसे वापरता येत नाहीत. त्यामुळे उधारी मी देऊ शकत नाही असे तुम्ही स्पष्ट सांगू शकता.
- उलट त्याच्याकडूनच पैसे मागा : जर एखादा मित्र किंवा नातेवाईक गरजू असेल आणि तो तुमचे पैसे वेळेवर परत करेल, तर त्याला नक्कीच पैसे द्या, परंतु जर कोणी त्याचा छंद पूर्ण करण्यासाठी किंवा त्याच्या सवयीमुळे पुन्हा पुन्हा पैसे मागितले तर त्याच्यावर ही युक्ती वापरा. त्याने तुमच्याकडून पैसे मागण्याचे वातावरण निर्माण करण्यापूर्वी तुम्ही त्याच्याकडे पैशाची मदत मागावी. तुमची गरज नसली तरी अशा लोकांसमोर खोटे पैसे मागून तुम्ही स्वतःला कठीण परिस्थितीत अडकण्यापासून वाचवाल.

### हो म्हणण्याआधी हे ४ प्रश्न विचारा...

1 कमाई आणि खर्च किती आहे? : नात्यात पैशाबद्दल बोलणे चांगले नाही असे अनेक जण मानतात. परंतु विश्वास ठेवा, सध्याच्या काळात पैसा खूप महत्वाचा आहे. लग्नानंतर या विषयावर बोलून नात्यात कटुता निर्माण करण्यापेक्षा लग्नाआधी या विषयावर मनमोकळेपणाने आणि अर्थपूर्ण संवाद साधलेला बरा. तुमचा खर्च आणि बचत करण्याच्या सवयी किती समान आहेत हे तुम्हा दोघांनाही जाणवेल. लग्नापूर्वी या सवयींवर चर्चा केल्यास भविष्यात पैशांवरून मोठे भांडण होण्याची शक्यता टाळता येईल.

2 मुल हवं की नको? : आता पूर्वीची पिढी राहिलेली नाही, ना तेव्हाची परिस्थिती राहिली आहे. आजकाल जोडपी लग्नाआधीच याविषयी उघडपणे बोलतात. त्यांना बाळ हवे आहे का? जर होय, तर किती वर्षांनी? तम्ही तमच्या भावी जोडीदाराशीही याविषयी बोलले पाहिजे, जेणेकरून उद्या कौटुंबिक दबाव आला तर तुमच्या दोघांमध्ये या विषयावर भांडण होणार नाही. मुलांबाबत तुमच्यामध्ये जो काही करार झाला असेल, गरज भासल्यास त्याबाबत दोन्ही कुटुंबांना त्याची माहिती द्या, ज्यामुळे तुमचा संसार शांत राहील. अनेकदा दोघांपैकी एकाला बाळ हवं असतं तर दुस-याला जबाबदारी घ्यायची नसते अशावेळी मतभेद होतात त्यामुळे आधीच काळजी घ्या.



3 लग्नानंतर आई वडिलांसोबत राहणार की वेगळे? : लग्नाआधी तुम्ही हे सुनिश्चित केले पाहिजे की तुम्ही दोघेही आपल्या आई वडिलांसोबत राहणार आहात की एकटे? यामुळे तुम्ही दोघेही मानसिकदृष्ट्या तयार व्हाल. लग्नानंतर आई-वडिलांसोबत तुम्ही राहत नसलात तरी आई-वडिलांना आर्थिक पाठबळ देण्याची जबाबदारी तुमची आहे का, यावरही चर्चा व्हायला हवी. जरी या सर्व अतिशय वैयक्तिक आणि नाजूक गोष्टी असल्या तरी त्यावर चर्चा करणे भविष्यासाठी चांगले असेल.

4 दोघांचे करियर गोल काय आहेत? : अनेक नोकरी करणाऱ्या मुली लग्नानंतर नोकरी सोडतात. तुम्ही तुमच्या जोडीदाराशी बोलले पाहिजे की तुम्हाला दुसऱ्या शहरात किंवा देशात चांगली नोकरी मिळाली तर त्यालाही तुमच्यासोबत जायला आवडेल का? की तुम्ही दोघेही दोन वेगवेगळ्या शहरात राहाल आणि काम कराल? या सर्व मुद्द्यांवर लग्नाआधी एकमत व्हायला हवे, अन्यथा लग्नानंतर करिअरवरून तणाव अनेकदा नात्यात दिसून येतो.

## शॉर्ट न्यूज

### श्रीरामपूर शहरात मोबाइल चोरीचे प्रकार वाढले

■ **श्रीरामपूर :** शहराच्या विविध भागांमध्ये भल्या पहाटे व सकाळी खिडकीमध्ये हात घालून मोबाइल चोरून नेण्याचे प्रकार वाढले आहेत. घराच्या दरवाजातूनही मोबाइल पळविले जात आहेत. त्यामुळे नागरिक हैराण झाले आहेत. पोलिसांनी वेळीच या मोबाइल चोरांचा बंदोबस्त करावा अशी मागणी जनतेतून होत आहे. परिसरात राहणाऱ्या काही सराईत लोकांवर संशय व्यक्त होत असून पोलिसांनी या बाबीकडे लक्ष देण्याची मागणी होत आहे.

### ऐतिहासिक चित्रांचा लोकार्पण सोहळा संपन्न

■ **नगर :** समाजामध्ये काम करीत असताना वैचारिक बांधिलकी जोपासत चांगले काम उभे करणे गरजेचे आहे, शहर विकासासाठी नागरिकांनी मतरूपी काम करण्याची संधी दिली आहे त्या माध्यमातून नियोजनबद्ध व कायमस्वरूपीच्या विकासाला गती दिली आहे, माजी उपमहापौर गणेश भोसले यांनी नेहमीच चांगल्या विचारातून नवनवीन संकल्पना समाजासमोर मांडण्याचे काम केले आहे, शहराला ५०० वर्षाचा महान इतिहास आहे तो एकत्रित मांडण्याचे काम केले आहे, इतिहासकार भूषण देशमुख आपल्या शहराचे ब्रँडिंग करत असून खरा इतिहास जोपासत समाजासमोर आणण्याचे काम करत आहे.

### भिंगार टेकडीवर वृक्षारोपण अभियान

■ **भिंगार :** टेकडी येथे राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने वृक्षारोपण अभियान राबविण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत भिंगारची टेकडी हिरवाईने फुलविण्यासाठी राष्ट्रवादी युवकचे भिंगार शहराध्यक्ष शिवम भंडारी यांच्या पुढाकारातून हा उपक्रम राबविण्यात आला. आमदार संग्राम जगताप व राष्ट्रवादीचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या वृक्षारोपण अभियानाचे प्रारंभ ज्येष्ठ नेते प्रा. माणिक विधाते यांच्या हस्ते वृक्षारोपणाने करण्यात आले.

### आ.रोहित पवार यांचे शिक्षणमंत्र्यांना पत्र

■ **जामखेड :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जन्मस्थान असलेले श्री क्षेत्र चौंडी येथील ऐतिहासिक जिल्हा परिषदेच्या शाळेच्या बांधकामासाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी आमदार रोहित पवार यांनी शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांच्याकडे केली आहे. याबाबतचे निवेदन त्यांनी मंत्र्यांना दिले. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवा निमित्त महाविकास आघाडी सरकारच्या काळात महापुरुषांशी संबधित ऐतिहासिक गावांमधील शाळा विकसित करण्यासाठी निधी देण्याची घोषणा तात्कालीन अर्थमंत्री अजित पवार यांनी अर्थसंकल्पात केली होती.

### रस्त्यांच्या कामासाठी ११ कोटी रूपयांचा निधी

■ **संगमनेर :** तालुक्यातील एकूण दहा रस्त्यांना पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या पाठपुराव्यातून ११ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाल्याने ग्रामीण भागातील रस्ते विकासाचा मोठा प्रश्न मार्गी लागला आहे, संगमनेर तालुक्यातील अनेक रस्त्यांची दुर्दशा झाल्याने महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे रस्त्यांच्या कामासाठी नागरिकांनी निधीची मागणी केली होती. रस्ता कामांसाठी मोठा निधी मिळाल्याने नागरिकांमधून समाधान व्यक्त होत आहे.

# दशक्रियेला बोलवा कावळ्या आधी मी हजर!

## सुजय विखे पाटलांचे उपहासात्मक भाषण

**नगर : प्रतिनिधी**

**लोकसभा निवडणुकीत माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांचा अहमदनगर लोकसभा मतदारसंघातून पराभव झाला. त्यानंतर त्यांनी मंगळवारी एका पतसंस्थेच्या वर्धापनदिन कार्यक्रमात जोरदार मार्मिक भाषण करत आगामी राजकारणातील भूमिकेचे संकेत दिले. पराभवातून मी शिकलो आहे. यापुढे दशक्रिया, वाढदिवस, जागरण-गोंधळ सारख्या खासगी कार्यक्रमांना उपस्थित राहणार. विकासकामापेक्षा जनसंपर्काला महत्त्व देणारेही लोक आहेत. दशक्रियेला बोलवा कावळ्या आधी मी हजर होईल, अशी वाक्यागणित उपहासात्मक टोलेबाजी करत त्यांनी आपल्या पुढील राजकीय भूमिकेचे संकेत दिले. या भाषणाचे व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर जोरदार व्हायरल होत आहेत.**



डॉ. सुजय विखे पाटील म्हणाले की, मागील पाच वर्षांत मला बराच अनुभव आला आहे. मतदानाचा आणि विकासकामांचा काहीही संबंध राहिलेला नाही. जेवढी रोहित्रे दिली तेवढाच करंट लोक आपल्याला देतात, असा माझा अनुभव आहे. काळ बदलत चालला आहे. विचार बदलत चालले आहेत, वैचारिकता बदल चालली आहे. दुर्दैवाने मला जनतेला काय पाहिजे हे मला कळलेच नाही, आजही कळत नाही. तरी सुद्धा काही गोष्टी घेऊन आपण पुढे चालणे या शिवाय पर्याय नाही. आम्हाला ज्यांनी साथ दिली त्यांना बरोबर घेऊन चालावे लागेल नाही तर त्यांना कोणी वाली राहणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

विखे पुढे म्हणाले,पतसंस्थेच्या व्यवहार प्रक्रियेत विश्वास महत्त्वाचा असतो. विश्वासावर जीवन चालते. दुर्दैवाने मधल्या काही काळात विश्वास ठेवण्याची परंपरा कमी होत चालली आहे. कोणीही कोणावर विश्वास ठेवायला तयार नाही. मुलगा वडिलांवर विश्वास ठेवत नाही. कार्यकर्ते नेत्यावर विश्वास ठेवत नाही, अशा प्रक्रियेत राजकारण नव्हे तर समाज संपतो. एखाद्या चांगल्या काम करणाऱ्या सरपंचाच्या पराभवाने; सरपंच संपत नाही. मात्र, गाव संपत. त्या गोष्टीची जाणिव व्हायला वेळ निघून गेल्यावर चर्चा करण्यात अर्थ नाही. माझ्या बरोबर अनेक जण राजकारणात आले. ते माझ्या बरोबर विकासकामे करत फिरले. मी त्यांना सांगत होतो, तुम्ही जेवढी विकासकामे करायला पळाल तेवढे विरोधक तुम्हाला पराभूत करण्यासाठी एकत्र येतील. मात्र, त्यांच्या पराभवानंतर ती अक्कल मला का आली नाही, हे मला कळेना. मी सल्ले दिले मात्र, त्याची अंमलबजावणी स्वतःवर केली नाही, अशी खंत त्यांनी व्यक्त केली.

आपण जेव्हा निवडणूक लढवितो तेव्हा आपल्या वाटते की समाजाला एखादी गोष्ट त्रास दायक वाटते. त्याच्या विरोधात कोण उभे राहणार. मात्र, निवडणुकीनंतर जाणिव झाली की, जनतेला एखादी गोष्ट मान्य असेल तर त्याच्या विरोधात आपण का जावे. बदललेले राजकारण ओळखण्यात मी अयशस्वी ठरलो. माणूस अनुभवाने शहाणा होतो. कमी वयात अनुभव आल्याने मी परमेश्वराचे आभार मानतो. मी आता ठरवलं आहे, सकाळी लवकर उठायचं. कुटुंबाला वेळ द्यायचा. लोकांना भेटायचं. लोकांची कामे झाली पाहिजेत, असे त्यांनी सांगितले.

पराभवानंतर मी विचार केला, हळूहळू बाहेर पडलो. माणसाला त्याच्या कामापेक्षा त्याच्या कर्तृत्वाची किंमत मिळाली पाहिजे. चुकीच्या पद्धतीने बदलेल्या राजकारणापासून आपण सावध राहिले पाहिजे. वेळ निघून गेल्यावर ती पुन्हा कोणासाठीच परत आलेली नाही. माझ्याकडे आता वेळ असल्याने मी खासगी कार्यक्रमांना उपलब्ध आहे. मंत्री विखे पाटलांना काम व दौऱ्यांमुळे खासगी कार्यक्रमांना उपस्थित राहणे शक्य होत नाही. त्यामुळे अशा कार्यक्रमांना मी उपस्थित राहणार आहे. मी ठरविले आहे. वाढदिवसाला हजर राहणार. आता तुम्ही रोहित्र, रस्ते असे काही सांगू नका. दशक्रियाविधी असेल तर सांगा. कावळ्याच्या आधी सुजय विखे हजर होईल. फोन लावा गडी हजर राहील. लोकसभेला आमचे समोरचे मित्र होते ते पहाटे चार वाजता लंगर तोडायला गेले. आता तर हेच. जागरण गोंधळाच्या कार्यक्रमाला बोलावले नाही तर मी कारवाई करेल. लंगर तोडायला मी येणार, माझ्यावर विश्वास ठेवा. एकतर माणूस फिरू शकतो किंवा विकास कामे करू शकतो. त्यामुळे समतोल ठेवणे क्लिष्ट आहे. विकासकामे करून पाहिले. आता संपर्क ठेऊन पाहू. तुमचे पोट दुखत असले तरी फोन लावा. मी डॉक्टर सुद्धा आहे, असे त्यांनी सांगताच एकच हशा पिकला.

माझ्या पराभवाचे अनेकांना दुःख झाले. तुम्ही माझ्या प्रचारासाठी पळाले मात्र, यश मिळाले नाही. मात्र, कार्यकर्ते, संघटनेची ताकद दाखवली. महाराष्ट्रात जे वातावरण होते त्यात आपण विजयाच्या जवळ येऊन थांबलो. यात तुमच्या सर्वांचे कष्ट होते, अशी साथ कायम ठेवा. जनसामान्यांचे कल्याण करण्यासाठी आपण आहोत. सुजय विखे पराभवाने खचणारा नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

## वाचकांच्या लेखणीतून

# आकाश आणि आभाळ

आपल्या डोक्यावर असलेले आकाश अथांग असते. त्याच्या विस्ताराचे आणि व्यापकत्वाचे मोजमाप आजपर्यंत कुणी करू शकलेले नाही. करूही शकणार नाही. आकाशाला ख, नभ, व्योम, गगन, अंतराळ, आभाळ आदी समानार्थी शब्द आहेत. आकाश आणि आभाळ हे शब्द सामान्य माणसांच्या नेहमीच्या वापरातले आहेत. पण आकाश आणि आभाळ हे दोन्ही शब्द समानार्थी असले तरी या दोन शब्दांच्या अर्थांमध्ये फरक आहे.

श्रीकृष्णाला अनेक नावे आहेत. कान्हा, श्रीहरी, गिरिधारी इत्यादी. पण साहित्यात या शब्दांचा वापर फार जपून करायचा असतो. शृंगारिक भावना किंवा प्रसंग वर्णन करताना कान्हा, श्रीहरी या शब्दांचा वापर होतो. मात्र दुःख, संकट वा असाह्य स्थिती असताना गिरिधर शब्द वापरला जातो.



**शृंगाराचा प्रसंग असेल तर**
**दे रे कान्हा चोळी अन् लुगडी**
किंवा
**तुझ्या मुरलीने तहानभूक हरली रे**
**नको वाजवू श्रीहरी मुरली**
असे म्हणतात.
असाह्य संत मीरा म्हणते :
**मेरे तो गिरिधर गोपाल**
**दूसरो न कोय**

आकाश आणि आभाळ शब्दांची गतही तशीच आहे. आकाश ढगाळ नसते. निरभ्र असते.
आभाळ ढगाळ असते. अभ्राच्छादित असते. ढगांनी व्यापलेले असते.
ढगाळ वातावरणात चांदणे शोभून दिसत नाही. निरभ्र वातावरणातच चांदणे शोभून दिसते. आकाश स्वच्छंदतेचे, आनंदाचे, स्वातंत्र्याचे प्रतीक आहे. एका गीतात म्हटले आहे:
**आकाशी फुलला चांदण्याचा मळा**
अथवा
**आकाशी झेप घे रे पाखरा**
**सोडी सोन्याचा पिंजरा**
आभाळ हे संकटाचे, दुःखाचे प्रतीक आहे. स्वरचित पद्य देतो :
आभाळाच्या नशिबी लिहिले
गीत वेदनेचे
कृष्णमेघ बघून मोर आनंदी होत असला तरी ढगांना कळ लागलेली असते.
एक चित्रपट गीत म्हणते :
**ढगाला लागली कळ**
**पाणी थेंब थेंब गळं**
ढग आपली कळ दूर कशी होईल या चिंतेत असतो. चिंता म्हणजे दुःखाचाच अंश नव्हे काय? म्हणून आभाळ हे दुःखाचे प्रतीक होय.
आकाश आणि आभाळ यातल्या अर्थच्छटा पाहता या दोन्ही शब्दांमधला फरक लक्षात यायला हरकत नाही.

**नाना ढवळे**
**८२८६९१३२२३**
**निघोज, ता. पारनेर,**
**जि. अहमदनगर.**

# नगरसह सात जिल्ह्यात होणार एमआयडीसीची प्रादेशिक कार्यालये

## उद्योग मंत्रालयाकडून अध्यादेश जारी

**नगर : प्रतिनिधी**

**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची (एमआयडीसी) नवी सात प्रादेशिक कार्यालये सुरु करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. तेथे ९२ अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीसह हिरवा कंदील दर्शविण्यात आला आहे. यासंदर्भातील अध्यादेश उद्योग मंत्रालयाने नुकताच जारी केला. त्यानुसार नगर, सातारा, सोलापूर, बारामती, जळगाव, अकोला व चंद्रपूर येथे प्रादेशिक कार्यालये सुरु करण्यात येणार आहेत. यानिमित्ताने तेथील औद्योगिक विकासाला चालना मिळण्याची अपेक्षा आहे. उद्योजकांच्या प्रशासकीय कामकाजासाठी त्यांना पुणे किंवा मुंबई मुख्यालयात हेलपाटे मारण्याची गरज उरणार नाही.**




राज्यातील वाढत्या औद्योगिकरणाच्या तुलनेत प्रादेशिक कार्यालयांची संख्या अत्यंत कमी आहे. काही ठिकाणी दोन-तीन जिल्ह्यांसाठी एकच प्रादेशिक कार्यालय आहे. तेथील मनुष्यबळही कमी आहे. त्यामुळे कामाचा ताण वाढला असून विविध कामांसाठी हेलपाटे मारावे लागत असल्याचे उद्योजकांनी शासनाच्या निदर्शनास आणून देण्यात आले होते. त्यामुळे नव्याने सात प्रादेशिक कार्यालयांच्या निर्मितीचा निर्णय उद्योग मंत्रालयाने घेतला. प्रत्येक कार्यालयासाठी प्रादेशिक अधिकारी, व्यवस्थापक, क्षेत्र व्यवस्थापक, उपरचनाकार, प्रमुख भूमापक, सहायक क्षेत्र व्यवस्थापक, सहायक, लिपिक टंकलेखक, वाहनचालक व शिपाई अशी पदे भरण्यास मंजुरी देण्यात आली आहे.

# काही तासातच बदलले नगर महापालिकेचे आयुक्त !

## आता यशवंत डांगे नवे आयुक्त

**नगर : प्रतिनिधी**

**महापालिकेच्या आयुक्तपदी काही तासांपूर्वी झालेली बदली प्रक्रिया रद्द करून आता नव्याने पिंपरी चिंचवडचे उपायुक्त यशवंत डांगे यांची नगर महापालिकेचे आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्याबाबतचे आदेश राज्य सरकारने काढले आहेत.**



नगर महापालिकेमध्ये आयुक्त पंकज जावळे यांच्यावर गुन्हा दाखल झाल्यानंतर हे पद रिक्त झाले होते. दोन दिवसांपूर्वी राज्य शासनाने अमरावतीचे आयुक्त देविदास पवार यांची नगर येथे नियुक्ती करण्यात आली होती. या विषयाला काही तास उलटले नाही, तोच आता राज्य सरकारने नव्याने बदलीची प्रक्रिया केली आहे. या पदावर पिंपरी चिंचवडचे उपायुक्त यशवंत डांगे यांची महापालिकेच्या आयुक्तपदी नियुक्ती केली आहे. या अगोदर डांगे यांनी नगर महापालिकेमध्ये दोन वर्ष उपायुक्त पदाचा पदभार पाहिला होता. त्यामुळे त्यांना नगरच्या प्रश्नांची जाण आणि अनुभव आहे. आता त्यांची आयुक्तपदी नियुक्ती झाली असून ते लवकरच पदभार स्वीकारतील.

(पान १ वरून)

## पुरवठा विभागातील अनागोंदी विरोधात लंके प्रतिष्ठानचा उद्या ठिय्या

शिधा पत्रिकांमधील नावे कमी,जास्त करणे आदी कामे अनेक दिवसांपासून ठप्प आहेत.तसेच विविध शैक्षणिक प्रवेशांसाठी लागणारे दाखले तहसील कार्यालयातून वेळेवर मिळत नाहीत.नागरिकांना तहसील कार्यालयात अनेक हेलपाटे मारावे लागतात.सध्या विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया सुरू आहे.त्यासाठी आवश्यक असणारे दाखले तहसील कार्यालयातून वेळेवर न मिळाल्यास विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची शक्यता आहे.ते टाळण्यासाठी तहसील कार्यालयात प्रलंबित असणारी विविध दाखल्यांची प्रकरणे मार्गी लाऊन विद्यार्थ्यांना तातडीने प्रमाणपत्राचे वाटप करावे अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेसाठी तालुक्यातील अनेक कुटुंबांना शिधा पत्रिका अद्ययावत करणे आवश्यक आहे.मात्र पुरवठा विभागातील संबंधित नायब तहसीलदारांच्या बेजबाबदारपणामुळे पुरवठा विभागाचे काम कमालीचे विस्कळीत झाले आहे.पुरवठा विभागातून कोणतीही माहिती मिळत नसल्याने महिलांमध्ये अस्वस्थता असल्याची बाब तहसीलदार सैंदाणे यांच्याची चर्चा करताना निदर्शनास आणून देण्यात आली.

यावेळी आर.आर. राजदेव,जितेश सरडे,अमित जाधव,ॲड. गणेश कावरे,गणेश मोरे,चंद्रभान ठुबे,सचिन पठारे,दत्ता ठाणगे,डॉ.नितिन रांधवन,पोपट गुंड उपस्थित होते.






# पुरवठा विभागाच्या अनागोंदीविरोधात मनसेचा ठिय्या

## रेशनकार्डच्या तक्रारींचे निवारण झाल्याशिवाय माघार नाही



**पारनेर : प्रतिनिधी**

**पारनेर तहसिल कार्यालयातील पुरवठा विभागाचया अनागोंदीविरोधात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने बेमुदत ठिय्या आंदोलन सुरू करण्यात आले असून रेशन कार्ड तक्रारींचे निवारण झाल्याशिवाय माघार घेणार नसल्याने मनसेच्या माथाडी कामगार सेनेचे राज्य उपाध्यक्ष तथा आंदोलक अविनाश पवार यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.**
पवार म्हणाले, सर्वसामान्य नागरिकाला रेशनकार्डमध्ये नाव जोडण्यासाठी, नाव दुरूस्तीसाठी,रेशनकार्ड ऑनलाईन करण्यासाठी, विभक्त कुटूंबाला नवे रेशनकार्ड काढण्यासाठी पारनेरच्या तहसिल कार्यालयातील पुरवठा विभागात नागरीकांना नागविले जात आहे. नागरिकांच्या काही हजारांमध्ये अशा तक्रारी आहेत. या तक्रारींविरोधात अधिका-यांकडे विचारणा केली असता ते दाद देत नाहीत. सेतू चालक अव्वाच्या सव्वा रकमा उकळून नागरिकांची लुट करतात. सेतू चालकास पैसा देऊनही कागदपत्रे पुरवठा विभागात सादर केली असता तेथील कर्मचारी उडवाउडवीची उत्तरे देतात. एजंटांच्या माध्यमातून नागरिकांना वेठीस धरण्याचे उद्योग या विभागात सुरू असल्याचा आरोप पवारांनी केला.

या आंदोलनात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या राज्य शाखेचे उपाध्यक्ष अविनाश पवार, सहकार सेनेचे जिल्हाध्यक्ष नितीन म्हस्के, सुपा शहराध्यक्ष अक्षय सुर्यवंशी यांच्यासह मनसेचे कार्यकर्ते नागरिक सहभागी झाले आहेत.

### सेतू चालकांवर गुन्हे दाखल करा

**सेतू कार्यालयातून देण्यात येणाऱ्या सुविधा, त्यासाठी आकारण्यात येणारे शासकीय शुल्क याबाबतची सनद मोठया अक्षरात सेतू केंद्रामध्ये दर्शनी भागात लावणे बंधनकारक आहे. मात्र याबाबत तक्रार करूनही ही सनद आजही लावण्यात आलेली नाही. अशा सेतू चालकांचे परवाने रद्द करण्याची मागणी पवार यांनी केली आहे.**

### गोरगरीबांवर उपासमारीची वेळ

**रेशन कार्ड हे विविध शासकीय सवलतींसाठी आवश्यक असते. शासनाच्या आरोग्य सेवेसाठी रेशनकार्डची आवश्यकता असताना आडलेल्या नागरिकाला रेशनकार्ड तात्काळ न देता चिरीमीरीसाठी हेलपाटे मारण्यास भाग पाडले जाते. मोठी रक्कम घेतल्याशिवाय रेशन कार्ड दिले जात नाही. रेशनकार्ड अभावी अनेक गोरगरीब नागरिक धान्यापासून वंचित असून त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली असल्याचे पवार यांनी सांगितले.**

# खा. लंकेंच्या पुढाकारातून सारोळा अडवाईला बस सेवा

## शालेय विद्यार्थी, नागरिकांची सोय

**सारोळा अडवाई : प्रतिनिधी**

**पारनेर ते सारोळा अडवाई या मार्गावर राज्य परिवहन महामंडळाकडून बस सेवा सुरू करण्यात आली असून त्यासाठी खासदार नीलेश लंके यांनी महामंडळाच्या विभागप्रमुखांकडे पाठपुरावा केला होता. या सुविधेमुळे पारनेर येथे शाळा महाविद्यालयास जाणारे विद्यार्थी तसेच नागरिकांची सोय झाली आहे.**



बसची सोय नसल्याने विद्यार्थी तसेच नागरिकांची ससेहोलपट होत होती. सारोळा अडवाईचे सरपंच दत्तात्रेय शिंदे तसेच उपसरपंच कुंदा आबुज यांनी या प्रश्नासंदर्भात खासदार नीलेश लंके यांच्याकडे दाद मागितली होती. खा. लंके यांनी तात्काळ विभाग नियंत्रक मनिषा सपकाळ यांच्याशी संपर्क करून या गावातील विद्यार्थी तसेच नागरिकांच्या सोयीसाठी बस सेवा सुरू करण्याच्या सुचना दिल्या होत्या. खा. लंके यांच्या कार्यालयाकडून विभागीय कार्यालय तसेच पारनेर आगार प्रमुख कार्यालयाशी पत्रव्यवहारही करण्यात आला होता. खा. लंके यांच्या सुचनेची दखल घेत विभाग नियंत्रक मनिषा सपकाळ यांनी पारनेर आगारास पत्र देऊन सारोळा अडवाई येथून सकाळी साडेआठ वाजता तर दुपारी साडेचार वाजता पारनेर येथून सारोळा अडवाई येथे जाण्यासाठी बस सेवा सुरू करण्याबाबत लेखी पत्र दिले असून प्रत्यक्षात ही बस सेवा सुरूही झाली आहे.

### खा. लंके यांच्याप्रती कृतज्ञता

**विद्यार्थी तसेच नागरिकांच्या बसअभावी होणाऱ्या गैरसोयीबाबत खा. लंके यांच्यापुढे कैफियत मांडल्यानंतर त्यांनी तात्काळ विभागीय नियंत्रकांशी संपर्क करून बससेवा सुरू करण्याबाबत सुचना दिली. पारनेर व नगर येथे पत्रव्यवहारही करण्यात येऊन प्रत्यक्ष बस सेवाही सुरू झाली. लोकप्रतिनिधी कसा असावा याचे खा. लंके हे मुर्तीमंत उदाहरण आहे. विद्यार्थी तसेच ग्रामस्थांच्या वतीने खा. लंके यांच्याप्रती आम्ही कृतज्ञता व्यक्त करत आहोत.**

**दत्तात्रय शिंदे, सरपंच**
**कुंदा आबूज, उपसरपंच**

### सुमारे ८० विद्यार्थ्यांना होणार लाभ

**सारोळा अडवाई येथून पारनेर येथे शाळा महाविद्यालयातील सुमारे ८० विद्यार्थी, विद्यार्थीनी दररोज प्रवास करतात. बसची सुविधा नसल्याने या विद्यार्थ्यांना खाजगी वाहनाने प्रवास करून शिक्षण घ्यावे लागत असे. प्रत्येक विद्यार्थ्याकडून दरमहा दोन हजार रूपये खाजगी वाहनालकाकडून आकारण्यात येत होते. ही सोय झाल्याने विद्यार्थीनींना मोफत तर विद्यार्थ्यांना सवलतीच्या दरात प्रवास करता येणार आहे.**

# सरडे यांचे सामाजिक उपक्रम तरूणाईसाठी पथदर्शक

## राणीताई लंके यांचे गौरोद्गार | वाढदिवसानिमित्त १८९ तरूणांचे रक्तदान



**देवीभोयरे फाटा : प्रतिनिधी**

**वर्षभर विविध उपक्रम राबवून आपली सामाजिक बांधिलकी जोपासण्याचे काम प्रामाणिकपणे पार पाडणारे राष्ट्रवादी काँग्रेस आयटी सेलचे प्रदेशाध्यक्ष जितेश सरडे यांचे उपक्रम समाजकारण, राजकारणात पाऊल टाकणाऱ्या तरूणाईसाठी पथदर्शक असल्याचे गौरोद्गार जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या राणीताई लंके यांनी काढले.**

सरडे यांच्या वाढदिवसानिमित्त देवीभोयरे फाटा येथे पुणे येथील संजिवनी रक्तकेंद्र संस्थेच्या सहकार्यातून रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरास श्रीमती लंके यांनी भेट देत सरडे यांना शुभेच्छा दिल्या. या शिबिरात १८९तरूणांनी रक्तदान केले.

यावेळी बोलताना राणीताई लंके म्हणाल्या, लोकनेते खासदार नीलेश लंके यांच्या खांद्याला खांदा लाऊन समाजकारण आणि राजकारणात कार्यरत असलेले जितेश सरडे हे प्रत्येक सामाजिक प्रश्नावर आपले योगदान देऊन सर्वसामान्यांना न्याय देण्याची भूमिका घेतात. दिन दुबळयांना आधार देण्याचे खा.नीलेश लंके यांचे धोरण आहे. खा. लंके यांच्याच धोरणाप्रमाणे सरडे हे सर्वसामान्यांच्या सुख, दुःखात सहभाग नोंदवून योगदान देतात हे कौतुकास्पद आहे.
जितेश सरडे यांनी राणीताई लंके यांनी रक्तदान शिबिरास उपस्थित राहून शुभेच्छा दिल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. ते म्हणाले, सर्वसामान्य प्राथमिक शिक्षकाच्या घरातून आलेले खा. नीलेश लंके हे आज नगर लोकसभा मतदारसंघाचे देशाच्या संसदेमध्ये प्रतिनिधीत्व करत आहेत. त्याचा त्यांच्या आमच्यासारख्या अनुयायांना सार्थ अभिमान आहे. खा. लंके यांनी आपल्या कर्तुत्वाच्या जोरावर दिल्ली सर केली असून लोकशाहीमध्ये मताची काय ताकद असते हे नीलेश लंके यांनी आपला विजय साकारून सिध्द केल्याचे ते म्हणाले.

### रक्तदान काळाची गरज

**कोरोना संकटात खा. नीलेश लंके यांच्यासोबत आम्ही काम केले. त्या काळात रक्ताचा प्रचंड तुटवडा जाणवला. त्यावेळी रक्तदानाचे महत्व अधोरेखीत झाले. रक्ताच्या एका पिशवीमुळे एखाद्याचे प्राण वाचू शकतात. म्हणूनच आम्ही तरूण दरवर्षी रक्तदान शिबिराचे आयोजन करून आमची सामाजिक बांधिलकी जोपसत आहोत.**

**जितेश सरडे**
**प्रदेशाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस, आयटी सेल**

# वर्धापनदिनाच्या आनंदाला वटवृक्षारोपणाची जोड!

■ दुर्गा महिला स्वयंसहायता गटाचा वर्धापनदिन साजरा
■ सामाजिक भावनेतून आगळा वेगळा उपक्रम

**पळवे खुर्द : प्रतिनिधी**

**उमेद अभियानांतर्गत कार्यरत असणाऱ्या पळवे खुर्द येथील दुर्गा महिला स्वयंसहायता गटाचा दुसरा वर्धापन दिन नुकताच उत्साहात पार पडला. या गटातील महिला सदस्यांनी एकत्र येत पर्यावरण संगोपनासाठी वृक्षारोपणाचा उपक्रम राबविण्याचा निर्णय घेवून १० वटवृक्षाचे रोपण करून संगोपनाची जबाबदारी स्वीकारली.**



त्याचबरोबर प्राथमिक शाळा मठवस्ती येथेही शोभेचे झाडे देवून शाळेतील वातावरण आनंददायी राहील यासाठी शोभेच्या झाडांची लागवड एक विद्यार्थी एक झाड याप्रमाणे करून एक आगळावेगळा संदेश देण्याचे काम गटाच्या माध्यमातून करून विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप केले.

गावातील तरुणांनी एकत्र येऊन नाम फाउंडेशन या सेवाभावी संस्थेच्या वतीने लोकसहभागातून केलेल्या जलसंधारणाच्या कामाला दुर्गा महिला स्वयंसहायता गटाने वृक्षरोपणाची जोड दिल्याने जलयुक्त पळवे खुर्द हरित पळवे खुर्द या मोहिमेला खऱ्या अर्थाने सर्वसमावेशक रूप प्राप्त झाले.शेळकेमळा तलावाच्या शेजारील खोलीकरण व रुंदीकरण केलेल्या ओढ्याच्या कडेने हे वृक्षारोपण करण्यात आले असून यावर्षी सुरवातीपासून वरुणराजाने दमदार हजेरी लावल्याने श्रीजगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज मित्र परिवार पळवे खुर्द यांचेवतीने ही वटवृक्षांची लागवड करण्यात आली.

गणेश राजाराम देशमुख यांनीही गावातील शाळेस वटवृक्षाची कृषिदिनी भेट देऊन लागवड करून ही मोहीम अजून मोठी करण्याच्या दृष्टीने सर्वांच्या वतीने प्रयत्न करण्याची गरज असल्याने दुर्गा महिला स्वयंसहायता गटाच्या वतीने हे पहिले पाऊल उचलून गावातील इतर महिला गटांना पर्यावरण संगोपनासाठी प्रयत्न करण्याचा संदेश दिला आहे.

यावेळी दुर्गा महिला स्वयंसहायता समूहाच्या अध्यक्षा काजोल अमोल शेळके, सचिव वनिता सुरेश शेळके, सदस्या मंगल सतीश शेळके ,शोभा रमेश शेळके ,मनीषा निलेश शेळके, ज्योती प्रवीण शेळके,शामल नितीन शेळके,वर्षा तबाजी मधे ,ज्योती अनिल शेळके,श्रीम.सुनिता दत्तात्रय शेळके,दिक्षा सचिन शेळके या महिला सदस्या उपस्थित होत्या.

# मळगंगा ट्रस्टचा नावलौकिक वाढविण्यासाठी प्रयत्नशिल

## नवनिर्वाचित विश्वस्त अनिल लंके यांची ग्वाही

**निघोज : प्रतिनिधी**

**मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे कार्याध्यक्ष शांताराम लंके उपकार्याध्यक्ष वसंत कवाद तसेच पदाधिकारी व विश्वस्त मंडळ यांच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शनखाली ट्रस्टचा नावलौकिक वाढविण्यासाठी आम्ही प्रयत्नशिल असल्याची ग्वाही नवनिर्वाचित विश्वस्त अनिल लंके यांनी दिली.**



■ **मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट विश्वस्त पदी मोठ्या मताधिक्याने विजयी झाल्याबद्दल अनिल लंके यांचा लंके भावकीच्या वतीने ज्येष्ठ मार्गदर्शक बाबाजी लंके यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.**

खंडोबा मंदिरात अनिल लंके हे विश्वस्त म्हणून मोठ्या मताधिक्याने विजयी झाल्याबद्दल
तसेच सल्लागार कमिटी सदस्य म्हणून नियुक्ती झालेल्या मंगेश लंके यांचा लंके भावकीच्या वतीने जय मल्हार देवस्थान ट्रस्टचे ज्येष्ठ मार्गदर्शक बाबाजी लंके यांच्या हस्ते हा सत्कार करण्यात आला.यावेळी लंके बोलत होते.

लंके भावकीचे कारभारी आबाजी लंके, पांडुरंग लंके, किसनराव लंके तसेच ग्रामस्थ व लंके भावकीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विश्वस्त लंके यावेळी म्हणाले गेली पंचवीस वर्षांपासून ट्रस्ट संस्थापक अध्यक्ष बाबासाहेब कवाद व त्यांच्या सहकाऱ्यांनी ट्रस्ट माध्यमातून मोठ्या प्रमाणात विकासकामे केली आहेत. खासदार नीलेश लंके यांच्या माध्यमातून आमदारकीच्या कार्यकाळात मोठ्या प्रमाणात विकासकामे झाली आहेत तसेच खासदार निधीतून मोठ्या प्रमाणात विकासकामे मार्गी लागणार आहेत. यासाठी गावाने संघटीतपणे ट्रस्ट पदाधिकारी व विश्वस्त मंडळ यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहण्याची गरज आहे.

जगप्रसिद्ध रांजणखळगे हा जिल्ह्यातील जनतेला मिळालेला अनमोल ठेवा आहे सरकारने या ठिकाणी विकासासाठी मोठ्या प्रमाणात जमीन उपलब्ध करून दिली आहे. राज्य सरकार किंवा केंद्र सरकार यामाध्यमातून खासदार नीलेश लंके हे मोठी विकासकामे मार्गी लावणार असून गाव व परिसर खासदार लंके यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे आहेत. मळगंगा देवी हे राज्यातील जागृत देवस्थान म्हणून देशात प्रसिद्ध असून याठिकाणी तिर्थक्षेत्र अंतर्गत मोठ्या प्रमाणात विकासकामे झाली असल्याची माहिती लंके यांनी दिली.

# पारनेर तालुक्याच्या वैद्यकीय पथकाने जपला सेवाभाव

## वारीच्या वाटेवर वारकऱ्यांची मोफत आरोग्य तपासणी




**निघोज : प्रतिनिधी**

**पारनेर तालुका मेडिकल प्रॅक्टिशनर्स असोसिएशन यांनी पारनेर तालुक्यातील वारकरी दिंडी सोहळा पायी वारीतील भाविकांची आरोग्याची काळजी घेत बुधवारी दिवसभर दिंड्यांना भेट देऊन प्रत्येक वारकऱ्यांची आरोग्य तपासणी करीत त्यांना मोफत औषधे देऊन सेवाभाव जपला.**

असोसिएशनचे हे दुसरे वर्ष असून यामध्ये प्रत्येक दिंडीतील वारकऱ्यांची आरोग्य तपासणी करीत त्यांना औषधे देण्याचे काम पारनेर तालुक्यातील वैद्यकीय पथकाने केले आहे. यामध्ये निमा संघटनेचे तालुकाध्यक्ष डॉ. अशोकराव सरोदे, डॉ, अजित लंके डॉ, सुनिल कदम, डॉ. बाळासाहेब घोगरे, डॉ.पांडुरंग थोरात, डॉ. बेलोटे, डॉ.कांडेकर, डॉ. श्रीमंदीलकर, डॉ. आढाव, डॉ. बी.बी.झावरे आदींनी तसेच त्यांच्या सहकाऱ्यांनी हा सेवाभाव केला आहे.

यामध्ये प्रामुख्याने भाऊसाहेब कोल्हे अध्यक्ष असलेली रामदास महाराज दुसाणे दिंडी सोहळा, थोरात महाराज यांची कुंड माऊली मळगंगा दिंडी सोहळा, गोरक्ष ढवण यांची कानिफनाथ दिंडी सोहळा, दत्तात्रय रसाळ यांची संत सावता दिंडी सोहळा तसेच अशोक सावंत यांची श्री संत निळोबाराय पालखी सोहळा आदी पन्नास पेक्षा जास्त दिंडी सोहळ्यातील पायी वारी भावीकांची वैद्यकीय पथकाने सुश्रुषा केली आहे.

ज्येष्ठ वैद्यकीय व्यावसायिक डॉ. अशोकराव सरोदे यावेळी म्हणाले या निमित्ताने वारीचा अनुभव कसा असतो याची माहिती तसेच प्रत्यक्ष वारकऱ्यांची सेवा म्हणजे प्रत्यक्षात पंढरपूरच्या पांडुरंगाची सेवा होत आहे या माध्यमातून गेल्या वर्षापासून ही वैद्यकीय सेवा मोफत तसेच असंख्य वारकऱ्यांना तब्बल तीस हजार रुपयांची औषधे मोफत दिली असून प्रत्येक दिवशी दहा ते बारा किलोमीटर पायी वारी करीत भाविक पंढरपूरला जातात पांडूरंगाची ओढ त्यांच्या मनात सातत्याने असते. आम्ही जे काही करीत आहोत ती एक सेवाभावी वृत्ती असून या निमित्ताने हिंदू समाजाच्या धार्मिक संस्कृतीला पाठबळ देण्याचे पुण्य आमच्या हातून होत असून आम्ही सुद्धा वारकऱ्यांएवढेच भाग्यवान असल्याचे प्रतिपादन त्यांनी व्यक्त केले आहे.


गेली पाच वर्षांपासून पायी वारी करणाऱ्या कन्हैय्या ज्वेलर्सच्या संचालिका शोभाताई मुकुंदराव निघोजकर यावेळी म्हणाल्या , वारीचा आनंद काही औरच आहे. प्रत्यक्षात पांडुरंग ही सेवा वारकऱ्यांकडून घेत असल्याचा अनुभव मला या वारीत क्षणोक्षणी आला आहे. पारनेर तालुका मेडिकल प्रॅक्टिशनर्स असोसिएशनच्या वैद्यकीय पथकाने वारकऱ्यांची वैद्यकीय सेवा करीत एक चांगले काम केले असून गेली अनेक दिवसांपासून वारकऱ्यांची पायी वारी सुरू असून यामध्ये सरकारने सुद्धा मोठ्या प्रमाणात सोयीसवलती देत वारकऱ्यांची सेवा केली असून पारनेर तालुक्यातून खाजगी डॉक्टरांनी मोफत औषधे देत तसेच तपासणी करीत चांगला सेवाभाव केला असल्याचे प्रतिपादन त्यांनी व्यक्त केले आहे.

# गाडीलगांवचा संकेत युथ क्रिकेट लीगमध्ये चमकणार !

## शेतकऱ्याच्या पोराची उत्तुंग झेप

**गाडीलगांव : सुरेश गाडीलकर**

**गाडीलगावमधील ज्ञानदेव गाडीलकर या शेतकऱ्याचा मुलगा संकेत याची १५ जुलै पासून सुरू होणाऱ्या युथ क्रिकेट लिग २०२४ मध्ये रांची रॉकर्स संघामध्ये आयकॉन खेळाडू म्हणून चमकणार आहे !**



पुणे येथील व्हेरॉक-वेंगसरकर क्रिकेट अकॅडमीच्या संकेत गाडीलकर याची बोर्ड ऑफ स्पोर्टस इन इंडियाच्या युथ लिग स्पर्धेसाठी पुरूष खुल्या गटातून निवड झाली आहे.
पारनेर तालुक्यातील गाडीलगांव येथील संकेत ज्ञानदेव गाडीलकर हा शेतकरी कुटूंबातील गुणी मुलगा. त्याचे प्राथमिक शिक्षण पुणे जिल्हयातील शिरूर येथे झाले तर तालुक्यातील निघोज येथील श्री मुलिकादेवी महाविद्यालयात त्याचे पदवीचे शिक्षण पुर्ण केले. क्रिकेट खेळाची लहानपणीपासूनच आवड असल्याने पदवी नंतर त्याने डेक्कन जिमखाना आणि दिलीप वेंगसरकर क्रिकेट अकादमीत क्रिकेटच्या सरावास सुरूवात केली. गेल्या सहा वर्षांपासून तो डेक्कन आणि व्हेरॉक वेंगसरकर क्रिकेट अकॅडमीत प्रशिक्षण घेत आहे. संकेत हा महाराष्ट्र क्रिकेट संघाचे प्रतिनिधीत्व करीत आहे. युथ क्रिकेट लिगसाठी आयकॉन खेळाडू म्हणून संकेत याची निवड झाल्याबद्दल त्याचे कौतुक करण्यात येत आहे.

### भारताचे प्रतिनिधीत्व करण्याचे ध्येय

**भारतीय संघाचा माजी खेळाडू व संघाचा कर्णधार महेंद्रसिंग धोनी तसेच वेगवान गोलंदाज महंमद शमी हे संकेत याचे आवडे खेळाडू आहेत. त्यांच्याच पावलावर पाऊल ठेऊन भविष्यात भारतीय क्रिकेट संघाचे प्रतिनिधीत्व करण्याचे माझे ध्येय असून त्यादृष्टीने मी मेहनत घेतो आहे.**

**संकेत गाडीलकर**
**उदयोन्मुख क्रिकेट खेळाडू**

### संकेत अष्टपैलू खेळाडू

**या वर्षी नॅशनल क्रिकेट अकादमीकडून खेळताना संकेत याने अष्टपैलू कामगिरी करीत सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते. उजव्या हाजाने गोलंदाजी करणारा संकेत मधल्या फळीत फलंदाजीही उत्म प्रकारे करतो. भारतीय क्रिकेट नियामक बोर्डाच्या वतीने घेण्यात आलेल्या राष्ट्रीय क्रिकेट शिबिरामध्ये त्याने अष्टपैलू कामगिरी करीत १११ धावा करतानाच तीन फलंदाज बादही केले होते.**

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com